साप्ताहिक
पत्रकारितेचे मूल्य जतन करणारे वृत्तपत्र...

# न्यायस्वातंत्र्य समता

संपादक : रमेश अ. शेळके
कार्यकारी संपादक-ॲड.चंद्रकांत गायकवाड
RNI NO. : MAHARAR/ 2010 / 36016
Website : nyayswatantryasamta.weebly.com

वर्ष – ५ अंक ४६ वा सोमवार दि. १४ डिसेंबर ते २० डिसेंबर २०१५ पुणे किंमत – २ रुपये पाने ४

## स्मार्ट सिटी प्रकल्प राबविताना महापालिकांचे अधिकार अबाधित राहणार– मुख्यमंत्री

नागपूर : स्मार्ट सिटी, अमृत हे प्रकल्प लोकसहभागातून करावयाचे आहेत. स्मार्ट सिटी प्रकल्प राबविताना महापालिकांचे अधिकार अबाधित राहणार आहेत. या प्रकल्पांतर्गत शहरांची निवड प्रक्रिया पारदर्शीपणे करण्यात आली असून सर्वपक्षीय नेत्यांच्या सूचनांचे स्वागत करुन राज्यातील शहरे आणि सामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सर्व मिळून प्रयत्न करुया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केले.

विधानसभेत गृह, महसूल व वन विभाग, नगरविकास, कृषी, पदुम, शालेय शिक्षण व क्रिडा या विभागांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा झाली. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री बोलत होते. ते म्हणाले, स्मार्ट सिटी आणि अमृत या दोन्ही योजना शहरांच्या शाश्वत विकासासाठी असून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या विविध सेवा अधिक कार्यक्षम करण्यासाठी या दोन्ही प्रकल्पांच्या माध्यमातून प्रयत्न केले जाणार आहेत. या दोन्ही योजनांच्या माध्यमातून सामान्य माणसांच्या जीवनात परिवर्तन आणण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. सामान्य माणसांचे जीवनमान उंचावण्यासाठी या दोन्ही योजना परिणामकारक ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या दोन्ही योजनांमध्ये लोकसहभागाने पुढाकार घेतला आहे. प्रत्येक महापालिका क्षेत्रातील सुमारे ४ ते ५ लाख नागरिकांनी आपली मते मांडून आणि सहभाग नोंदवून शहराचा आराखडा तयार केला आहे. राज्य शासनातर्फे या शहरांची निवड प्रक्रिया



पारदर्शीपणे करण्यात आली आहे. तरी देखील या संदर्भात सर्वपक्षीय सदस्यांच्या काही सूचना असतील, काही त्रुटी असतील त्यात आवश्यक ते बदल करण्यात येतील.

स्वातंत्र्योत्तर काळात देशात शहरीकरण आणि नागरिकरण वेगाने वाढत गेले. महाराष्ट्र हे ५० टक्के नागरीकरण झालेले राज्य आहे. परिणामी शहरे बकाल झाली आहेत. झोपडपट्टी वाढली आहे. सांडपाणी, कचरा, पिण्याचे पाणी यांचे प्रश्न निर्माण झाले आहेत. झालेले नागरीकरण विकेंद्रीत करण्यासाठी केंद्र शासनाने अमृत आणि स्मार्ट सिटी अभियान सुरु केले आहे. राज्याच्या सकल उत्पन्नात शेती अर्थ व्यवस्थेचा वाटा ११ टक्के आहे. शेतीवरच्या रोजगारावरचा भार कमी केल्याशिवाय शेती फायद्यात येणार नाही. स्मार्ट सिटी आणि अमृत योजनेतून जो पुढाकार घेण्यात आला आहे, तो फक्त श्रीमंतांसाठीच नाही तर समाजातल्या प्रत्येक घटकाच्या विकासासाठी आणि शहरांच्या शाश्वत विकासासाठी घेण्यात आलेला आहे. आज एकही शहर असे नाही की जिथे कचऱ्याची विल्हेवाट १०० टक्के होते. सांडपाण्यावर प्रक्रिया केली जात नाही. हे चित्र या दोन्ही योजनांच्या माध्यमातून बदलण्यात येणार आहे. सांडपाण्याच्या प्रक्रियेबरोबरच हागणदारीमुक्त आणि सुरक्षित शहरे तसेच सार्वजनिक परिवहन व्यवस्थेचे एकत्रीकरण हे स्मार्ट सिटीतून साध्य केले जाणार आहे. हे करीत असताना महापालिकेचे अधिकार अबाधित ठेवण्यात येतील, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

राज्यातील नगरपंचायतींसाठी पदनिर्मिती प्रक्रिया सुरु झाली आहे. कालांतराने विशेष मोहीम घेऊन नगरपंचायतींच्या इमारतींचे बांधकाम करण्यात येईल. सर्व मिळून जनतेचे जीवनमान उंचाविण्यासाठी स्मार्ट सिटी आणि अमृत या दोन्ही योजना यशस्वी करुया,असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

## जमीन खरेदी–विक्रीतील फसवणुकीच्या तक्रारी आता आर्थिक गुन्हे शाखेकडे

पुणे : पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील जमिनीच्या खरेदी-विक्रीसंदर्भात घडणाक्षवया गुन्ह्यांच्या तक्रारी आर्थिक गुन्हे शाखेकडे करण्याचे आवाहन पुणे ग्रामीणचे पोलीस अधिक्षक जय जाधव यांनी केले आहे.

पुणे ग्रामीण जिल्ह्यातील देहूरोड, पौड, तळेगाव दाभाडे, तळेगाव एमआयडीसी, वडगाव मावळ, कोमशेत, लोणावळा, हवेली, वेल्हा, राजगड यो पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील जमिनींचे भाव मोठ्या प्रमाणात वाढलेले असल्याने या भागात जमिनीच्या खरेदी-विक्रीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात होत आहेत. या खरेदी-विक्रीच्या व्यवहारात फसवणूक होण्याचे अनेक घटना घडल्या असल्यामुळे पोलीस ठाण्यांमध्ये यासंबंधी तक्रारी अर्ज करणा-यांचीही संख्या वाढलेली आहे. या वाढत्या फसवणूकीच्या तक्रारींमुळे पोलीस ठाण्यांमध्ये अतिरिक्त कामाचा ताण पडत असल्यामुळे तक्रारीचे निवारण वेळेत होत नाही.

दाखल केलेल्या तक्रारीवर पोलिसांकडून जाणूनबुजून दिरंगाई होत असल्याचा गैरसमज नागरिकांमध्ये होत असल्यामुळे यापुढे तक्रारदारांनी यासंबंधीचे आपापल्या तक्रारी पाषाण रोडवरील चव्हाणनगर पोलीस मुख्यालयातील आर्थिक गुन्हे शाखेकडे कराव्यात असे आवाहन पुणे ग्रामीणचे पोलीस अधिक्षक डॉ. जय जाधव यांनी केले आहे.

## केजरीवालांच्या कार्यालयावर सीबीआयचा छापा

नवी दिल्ली- दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या कार्यालयावर सीबीआयने मंगळवारी छापा टाकला. मुख्यमंत्र्यांचे कार्यालय सीबीआयने सील केले आहे. केजरीवाल यांनी स्वतः ट्विटरवरून अशी माहिती दिली. थेट मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयावर छापा टाकण्याची ही पहिलीच घटना आहे.

कार्यालय सील केल्याने केजरीवालांनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला आहे. मोदी सरकार हे भित्रं आणि मनोरुग्ण असल्याची टीका केजरीवाल यांनी केली आहे. तसेच मोदींना मला राजकीयदृष्ट्या हाताळता आले नाही म्हणून त्यांनी हा छापा टाकल्याचा दावाही केजरीवाल यांनी केला.

मात्र हा छापा केजरीवालांवर नव्हे तर मुख्य सचिव राजेंद्र कुमार यांच्या कार्यालयावर करण्यात आल्याचे स्पष्टीकरण सीबीआयने दिले. मात्र, सीबीआयच्या स्पष्टीकरणानंतरही केजरीवाल यांनी सीबीआय खोटं बोलत असल्याचा आरोप केला आहे. राजेंद्र कुमार यांच्या नावाखाली माझ्या कार्यालयाची तपासणी सुरू असल्याचे केजरीवाल यांनी सांगितले.

0-0-0

## आयपीएलमध्ये धोनी पुण्याकडून खेळणार




पुणे - इंडियन प्रिमियर लीगच्या (आयपीएल) नवव्या मोसमात महेंद्रसिंह धोनी, अजिंक्य रहाणे आणि आर. अश्विन हे पुण्याच्या संघाकडून खेळणार आहेत. तर, सुरेश रैना, रवींद्र जडेजा राजकोट संघासाठी खेळणार आहेत. धोनी आणि रैना आयपीएलमध्ये पहिल्यांदाच एकमेकांविरुद्ध खेळणार आहेत.

मुंबईच्या वांद्रे कुर्ला संकुलातील एमसीएच्या क्लबहाऊसमध्ये आयपीएल ड्राफ्टचे आयोजन करण्यात आले होते. या ड्राफ्टच्या माध्यमातून पुणे आणि राजकोट या आयपीएलच्या दोन नव्या संघांना आगामी दोन मोसमांसाठी पाच-पाच प्रमुख शिलेदारांची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार पुणे संघाच्या फ्रँचायझीने महेंद्रसिंग धोनी, अजिंक्य रहाणे, आर.अश्विन, स्टीव्हन स्मिथ, फॅफ डू प्लेसिस या नावाजलेल्या खेळाडूंना संघात समाविष्ट करून घेतले. तर रवींद्र जडेजा, सुरेश रैना, ब्रेंडन मॅक्कुलम, जेम्स फॉकनर, ड्वेन ब्राव्हो हे पाच खेळाडू राजकोट संघाकडून खेळणार आहेत.

पुणे फ्रँचायझीने धोनीला आणि राजकोटने रैनाला १२.५ कोटीत संघात दाखल करून घेतले. राहणेसाठी पुणे फ्रँचायझीने ९.५ कोटी मोजले, तर त्याच किमतीत राजकोटने जडेजाला संघात समाविष्ट केले. अश्विन, मॅक्कुलम यांच्यावर प्रत्येकी ७.५ कोटींची बोली लागली. स्मिथ आणि फॉकनर यांच्यावर दोन्ही फ्रँचायझीने प्रत्येकी ५.५ कोटी खर्च केले आहेत. उरलेल्या ४० खेळाडूंचा लिलाव ६ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

# संपादकीय...

## संत गाडगेबाबांच्या कर्तृत्वाची उंची

संत गाडगेबाबा महाराष्ट्राला पडलेले व सत्यात उतरलेले एक स्वप्न. २० डिसेंबर रोजी त्यांचे पुण्यस्मरण करताना. मन भुतकाळात शिरते, गाडगेबाबांनी आपल्या लहान वयात एका स्नेह भोजनाचे आयोजन केले होते. पंचक्रोशीतील समवयस्क तरूणांना एकत्र घेऊन या भोजनाचे त्यांनी आयोजन केले होते. स्नेह भोजनाचे अतिथी होते. परिसरातील, अंध, अपंग, वयोवृध्द माणसे, यांना गाडगेबाबांनी गोडधोड जेऊ घातले. त्यांनी दिलेल्या या स्नेह भोजनाचे खूप कौतुक झाले. त्यावेळच्या काळामध्ये दिलेले हे स्नेहभोजनापासून आजची तरूण पिढी काय बोध घेईल. स्वतःच्या वाढदिवसाच्या निमित्त साधून नंगानाच करत फ्लेक्सचा बाजार मांडणारी ही पिढी. अंध अपंगांना जेवण देणे त्यांचा सन्मान करणे ही गोष्ट कधीही त्यांच्या मनाला शिवणार नाही. ज्यांनी ज्यांनी आपल्या वाढदिवसांच्या दिवशी गरजूंना अन्नदान, वस्त्रदान केले त्यांचे आम्ही स्वागत करतो. परंतु अशी गोष्ट आमच्या ऐकविण्यात नाही.

परीट समाजातील दृष्ट चालितीती विरूध्द या पुरोगामी विचारांच्या या संताने बंड पुकारले,ते सर्वांना सांगत, अरे, दारू पिऊ नका, या दारूमुळे आपले वैभव नष्ट झाले. परंतु हा कोण मोठा होऊन गेला? आम्हाला शिकवायला?, असे शब्दच त्यांच्या कानावर पडले. संत गाडगेबाबांना नेहमी वाटायचे कोण तरी मनुष्य पाहिजे, ज्यांचे लोक ऐकतील, त्यांचा सन्मान करतील, पण हे घडायला तयार नव्हते.

अचानक या संताने आपल्या संसाराचा त्याग करून घर सोडले आणि जवळ जवळ एक तप अज्ञातवासात घालावले. अज्ञातवासात असताना त्यांनी लोकांचा बारीक अभ्यास केला. हे लोक कोठे चुकतात, चुकीच्या सिध्दांतांचा मागे का लागतात याचा शोध घेतला. समाज मन जाणून घेतले. अंधश्रध्दा, नशेबाजी, बेकारी, निरक्षरता, अस्वच्छता या गोष्टी लोक बेमालुमपणे पाळतात यांच्या लक्षात आले. त्यांनी पुर्ण समाजामन जाणल्यानंतर प्रवचनांच्या माध्यमातून प्रबोधन करण्याचा निर्णय घेऊन तो लगेच अमलात आणला.

लोकांच्या बोली भाषेत, त्यांच्याशी संवाद साधत त्यांनी लोकांना चुका दाखवत, ती सुधारण्याचा आग्रह धरला. पाहता-पाहता या संताने अवघा महाराष्ट्र प्रवचनाच्या माध्यमातून पिंजून काढला. त्यांच्या प्रवचनाला होणारी गर्दी तथाकथीत पुढाऱ्यांच्या छातीत धडकी भरवत असे.

गाडगे बाबांनी गावागावातील सुधारणा करून अनेक दानशूर व्यक्तींना दानकरण्याचे आवाहन केले. त्यांच्या सहकार्याने बघता बघता गावातील अनेक कामे होऊ लागली. कामामध्ये लोकसहभाग वाढू लागला. गाडगेबाबांनी स्वच्छतेचा आग्रह धरला. आयुष्यभर हातात झाडू घेऊन गावोगाव स्वच्छ केली. हा महात्मा हातात झाडू घेतो हे पाहून लोकांनी हातात झाडू घेऊन गावे स्वच्छ करण्यासाठी अनेकांनी पुढाकार घेतला. आपल्या कर्तृत्वाने त्यांनी लोकांना वळण लावले.

त्यांनी शिक्षणाचा आग्रह धरला, आश्रम शाळा बांधल्या आयुष्याभर फक्त लोकांनी दिलेले शिळे अन्न खाऊन समाजसेवा केली. व्यसनमुक्ती, स्वच्छता अभियान, अनिष्ठ चालीरीती विरूध्द सुरू ठेवलेली लढाई पाहता हा संत किती मोठा होता. त्याच्या कर्तृत्वाची उंची न मोजण्या ऐवढी होती हे दिसते त्यांच्या कर्तृत्वाने प्रभावीत होऊन प्रबोधनकार ठाकरे यांनी त्यांचे जीवन चरित्र लिहिले. या महान संताला आदरांजली वाहताना त्यांनी दिलेल्या मार्गाने आपण चालण्याचा निर्धार करू या.

न्यायस्वातंत्र्य समता हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक रमेश अभिमन्यू शेळके यांनी यश एन्टरप्राईजेस डी १४ साई सयाजीनगर वारजे, पुणे-४११ ०५८ येथे छापून सर्व्हे नं.४/१२ महात्मा फुले वसाहत कोंढवा खुर्द, कमेला पुणे-४११ ०४८ येथून प्रकाशित केले.

(या अंकामध्ये छापलेल्या मजकुरांशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. वादविवाद पुणे न्यायकक्षेत)

# फायदे आणि मर्यादा जीएसटीच्या

देशातील सर्वात महत्त्वाची आर्थिक सुधारणा म्हणून जीएसटीकडे पाहिले जाते. इतर अनेक देशांमध्ये अशा प्रकारचा कर अंमलात आहे. परंतु आपल्या देशातील विविध राजकीय पक्षांचे आर्थिक दृष्टीकोन, विविध राज्यांमधील भिन्न भौगोलिक, आर्थिक परिस्थिती सामावून घेत नवी करप्रणाली निर्माण करणे अतिशय गुंतागुंतीचे तसेच क्लीष्ट काम आहे. त्या दृष्टीने पाहता जीएसटी काय साधेल आणि काय साधणार नाही याचा वेध.

संसदेच्या या वेळच्या हिवाळी अधिवेशनात वस्तू आणि सेवा कर (जीएसटी), रिअल इस्टेट यासह अकरा प्रमुख विधेयके मार्गी लागणे महत्त्वाचे ठरणार आहे. त्या दृष्टीने चर्चाही सुरू आहे. त्यातही सध्या देशात सर्वात महत्त्वाची आर्थिक सुधारणा म्हणून समान दराच्या वस्तू आणि सेवा कराकडे पाहिले जाते. उद्योजक आणि व्यापार जगताकडून अशा प्रकारच्या कराची मागणी बर्याच काळापासून होती. ती यावेळी पूर्ण होते का याकडे सार्यांचे लक्ष लागले आहे. सरकारही जीएसटी विधेयक संमत करण्याबाबत आग्रही आहे. हे विधेयक संमत करण्यात अडथळे आणणे देशासाठी नुकसानदायक ठरेल, असे अर्थमंत्री अरूण जेटली यांनी सांगितले.या विधेयकाला काँग्रेसचा पाठिंबा मिळावा यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी आणि माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्याशी चर्चा केली. यामुळे हे विधेयक संमत होण्याबाबत आशा पल्लवीत झाल्या होत्या. परंतु नॅशनल हेरॉल्ड प्रकरण समोर आले आणि काँग्रेसने आक्रमक पवित्रा घेतला. त्यामुळे हे विधेयक संमत होण्यास विलंब लागण्याची शक्यता दिसत आहे. मागील वर्षापर्यंत जीएसटीबाबत केंद्र सरकारने ताठर भूमिका घेतल्यामुळे आणि स्वतःचा दृष्टीकोन जवळपास लादण्याच्या प्रयत्नातून लोकसभासुध्दा अनेक वेळा स्थगित झाली होती. शिवाय देशातील विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या पक्षांची सरकारे असल्यामुळे जीएसटीसाठी त्या सर्वांचा पाठिंबा मिळवणे पूर्वीच्या सरकारला शक्य झाले नव्हते. सरकार असे विधेयक संमत करू शकेल किंवा नाही इतके संशयाचे वातावरण निर्माण होऊन आर्थिक जगतात निराशा पसरली होती. पूर्वीच्या पंतप्रधानांना विदेश दौर्यातसुध्दा अनेक संस्थांनी वा सरकारांनी अशा तर्हेचा समान कर नसेल तर आम्हाला भारतात गुंतवणूक करणे कठीण जाईल अशा सूचना केल्या होत्या. त्या सर्वांचा परिणाम म्हणून विद्यमान सरकारने ही करप्रणाली लागू करण्यासाठी कंबर कसली आहे.

आतापर्यंत सर्व वस्तुंवरील लेबलच्या खाली असणारी कमाल किरकोळ किंमत म्हणजे मॅक्झिमम रिटेल प्राईस ही वेगवेगळ्या राज्यातील करांच्या विविध दरांचा विचार करून छापलेली दिसते. परंतु हे दर निश्चित किती आहेत हे विक्रेत्यालाही माहित नसते आणि उपभोक्त्यालाही माहित नसते. कारण उत्पादित वस्तू शेजारच्याच राज्यात विकली जाणार आहे की दहा-पंधरा राज्ये ओलांडून पलीकडे विकली जाणार आहे हे कोणालाच माहित नसते. या अडचणी आणि खर्च विचारात घेऊन त्यापेक्षा जास्त नफा देणारी किंमत ठरवली जाते. याचा परिणाम म्हणून कमाल किरकोळ किंमत ही आज उपभोक्त्यांच्या शोषणाचे एक साधन बनली आहे. त्याचबरोबर वेगवेगळ्या राज्यांमधील विविध वस्तुंवरील उत्पादन कर, विक्रीकर भिन्न असल्यामुळे उत्पादनाचा वाहतूक खर्च आणि वाहतुकीचा वेळ अतोनात वाढले आहेत. त्याचा परिणाम म्हणून देशामध्ये असलेला एकूण बाजार हा सामायिक बाजार अर्थात कॉमन मार्केट न बनता खंडित बाजार बनतो. हे लक्षात घेता देशभर एकाच दराने हे कर लागले तर वस्तू आणि सेवांचा प्रवाह अतिशय सुलभ होऊन सर्वत्र समान किमतीला वस्तू मिळून संपूर्ण देशाचा एक बाजार निर्माण होण्याची प्रक्रिया निर्माण होईल. त्यामुळे या कराकडे स्वातंत्र्योत्तर काळातली मोठी आर्थिक सुधारणा अशा दृष्टीकोनातून पाहिले जात आहे.

असे असले तरी या नव्या कर प्रणालीमुळे काही मर्यादाही निर्माण होणार आहेत. देशात वेगवेगळ्या राज्यांमध्ये स्थानिक करांचे दर कमी आकारून उत्पादन आणि व्यापार यामध्ये त्या त्या राज्याने स्वतःचे वैशिष्टयपूर्ण स्थान निर्माण केले आहे. उदाहरणार्थ मध्य प्रदेशमध्ये कपडय़ांच्या विक्रीवरील कर इतके कमी आहेत की, आजबाजुच्या राज्यांमधील लोक स्वतःच्या उपयोगासाठी आणि व्यापारासाठीही तिथे जाऊन माल खरेदी करतात. अशा परिस्थितीत देशभरात एकच समान कर लागू झाला तर हे ठिकठिकाणचे वैशिष्टय़ आणि स्पर्धात्मक शक्ती लुप्त होऊन केवळ मोठय़ा कंपन्यांच्या देशभर विकल्या जाणार्या मालासाठी बाजार निर्माण होण्याची शक्यता आहे. सध्याच्या संकल्पनेनुसार समान वस्तू आणि सेवा करामध्ये दारू तसेच पेट्रोल या वस्तू समाविष्ट नाहीत. कारण अनेक राज्यांमध्ये या वस्तुंच्या करापासून बराच मोठा महसूल मिळत असल्यामुळे तो मिळवण्याचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचे ठरले आहे. करांच्या रचनेमध्ये प्रमाण दर हा १५ ते साडे पंधरा टक्के, सामान्य उपभोग्य वस्तुंसाठी चार ते सहा टक्के आणि चैनीच्या वस्तुंसाठी सुमारे ४० टक्के आकारण्याचे प्रस्तावित केले जात आहे. सरकारने हे दर विरोधी पक्षांनी मागितलेल्या दरांपेक्षाही कमी ठेवले. त्यामुळे जीएसटीसाठी विरोधी पक्षांचा पाठिंबा मिळवणे सोपे होईल.

जीएसटीबाबत आंतरराज्य करांचा मुद्दा वादाचा होता. केंद्र सरकारने त्यावर एक टक्का कर लावावा असे सुचवले होते. परंतु त्यामुळे किंमती वाढतील अशी टीका करून काँग्रेसने हा अतिरिक्त कर रद्द करावा असे म्हटले होते. सरकारने आता तेही मान्य करण्याचे ठरवले आहे आणि अजुनही काही मतभेदाचे मुद्दे शिल्लक राहिल्यास ते बाजुला ठेवून मुलभूत अशी प्रणाली अंमलात आणावी, नंतर त्यात बदल करत जावे अशी सरकारची निती दिसत आहे. या पार्श्वभूमीवर हा कर येत्या एक एप्रिल २०१६ पासून खरोखर लागू झाला तर ग्रामपंचायतींचे कर, नगरपालिकांचे सीमा कर तसेच राज्यांचे सीमा कर हे सर्व रद्द होऊन एकूण मिळणार्या उत्पन्नाची न्याय्य वाटणी या सर्वांमध्ये व्हावी अशा तर्हेचा प्रस्ताव आहे. जीएसटी लागू झाल्यास ठिकठिकाणचे करवसुलीचे खर्च कमी होतील; लोकांचा, व्यापार्यांचा कर देण्याचा वेळ वाचेल. त्यातून एक नवी व्यापारप्रणाली निर्माण होऊन उत्पादन आणि उपभोग व्यवस्थेवर तिचा सकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. म्हणजे करांचे जाळे तुटून एक सुसूत्र कररचना निर्माण होईल. हे महत्त्वाचे आहे. केंद्र सरकारने मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या उपसमितीने एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. तो असा की, ही करांची प्रणाली असणार आहे. त्यातून सगळ्याच प्रकारचे आर्थिक परिणाम दिसतील असे नव्हे. म्हणून पायाभूत सुविधा निर्माण करणे, तांत्रिक शिक्षणाची प्रणाली निर्माण करणे, उत्पादनाची क्षमता आणि कार्यकुशलता वाढवणे हे सर्व घटक स्वतंत्रपणे विचारात घ्यावे लागणार आहेत. त्यातून राज्या-राज्याची कार्यक्षमता, गुणवत्ता आणि स्पर्धाशक्तीही सिध्द होणार आहे. अशा परिस्थितीत समान वस्तू आणि सेवा कर कधी अंमलात येतो आणि त्याचे प्रत्यक्ष परिणाम काय दिसतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

येथे एक वेगळा मुद्दा विचारात घेणे आवश्यक आहे. तो म्हणजे, ज्या राज्यांमध्ये (विशेषतः नैऋत्येकडील आणि उत्तरेकडील) उत्पादन हे प्रामुख्याने संस्कृती म्हणून स्वतःच्या उपयोगासाठी केले जाते, तिथे बाजार आढळत नाही. अशा प्रदेशांमध्ये पैशाच्या रूपाने उत्पन्न कमी असते. त्यांना अशा तर्हेचा १५ टक्के दराचा वस्तू आणि सेवा कर देणे हा बोजा बनू शकतो. म्हणून वेगवेगळ्या राज्यांवर याचे कोणते प्रतिकूल परिणाम होतील आणि बाजार यंत्रणेशिवाय समाज जगू शकतो हे सामान्यतः जाणवत नसल्यामुळे बर्याच ठिकाणी या करामुळे प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. मुख्यत्वे वस्तू आणि सेवा कर हा उप्रत्यक्ष कर आहे. म्हणजे प्रथम विक्रेता तो भरत असतो आणि नंतर तो उपभोक्त्यांकडून वसूल करतो. आयकर, संपत्तीकर इत्यादी हे प्रत्यक्ष कर आहेत. उत्पन्न मिळवणारा माणूस स्वतः हे कर भरतो. जगभर उच्च उत्पन्न असणारे लोक उत्पन्न आणि संपत्ती वाढूनसुध्दा वाढीव कर देण्यासाठी तयार नसतात. कर वाढवू नयेत यासाठी ते राजकीय पक्ष तयार करतात, दबावगट तयार करतात, कायद्याचे उल्लंघन सरसकट होते. परिणामस्वरूप आज सर्व देशांमध्ये उत्पन्न विषमता पराकोटीची वाढली आहे. अशा स्थितीमध्ये म्हणजे बहुतांश लोक गरिब असताना त्यांना उच्च दराचा वस्तू आणि सेवा कर द्यावा लागला तर एकीकडून गरिबी, मजुरीचे कमी दर आणि बेरोजगारी यांचा मारा आणि दुसरीकडून श्रीमंत असो वा गरिब, सगळ्यांना समान असा वस्तू आणि सेवा कर असे चित्र निर्माण होणयाची दाट शक्यता आहे. तसे झाल्यास देशातील आर्थिक विषमता आणि वेगवगळ्या आर्थिक क्षेत्रात काम करणार्या लोकांमधील आर्थिक विषमता (शेती विरूध्द कारखानदारी) वाढून गरिब-श्रीमंत हे तणाव वाढतील का, असाही प्रश्न निर्माण होतो. आज तरी सरकार वस्तू आणि सेवा कराचा विचार करताना उद्योजकांची आणि सरकारच्या महसुलाची सोय याकडे प्रामुख्याने लक्ष देताना दिसतेय. पण यातून विषमता वाढू शकेल या शक्यतेकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे.

# गाडगे महाराज

गाडगे महाराज (फेब्रुवारी २३, १८७६- २० डिसेंबर १९५६ ) हे ईश्वर कशात आहे ही नेमकी जाणीव असलेले संत आणि गोरगरीब, दीनदलित यांचा ऐहिक व आध्यात्मिक विकास होण्यासाठी; अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे होते. तीर्थी धोंडापाणी देव रोकडा सज्जनी । असे सांगत दीन, दुबळे, अनाथ, अपंगांची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. देवळात जाऊ नका, मूर्तिपूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी-पुराणे, मंत्र-तंत्र, देवदेवस्की, चमत्कार असल्या गोष्टींवर विश्वास ठेऊ नका. अशी शिकवण आयुष्यभर त्यांनी लोकांना दिली. माणसात देव शोधणाऱ्या या संताने लोकांनी दिलेल्या देणग्यांतील पैशातून रंजल्या-गांजल्या, अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात ठिकठिकाणी धर्मशाळा, अनाथालये, आश्रम, व विद्यालये सुरू केली. रंजले-गांजले, दीन-दुबळे, अपंग-अनाथ हेच त्यांचे देव. या देवांतच गाडगेबाबा अधिक रमत असत. डोक्यावर झिंज्या, त्यावर खापराच्या तुकड्याची टोपी, एका कानात कवडी, तर दुसऱ्या कानात फुटक्या बांगडीची काच, एका हातात झाडू, दुसऱ्या हातात मडके असा त्यांचा वेश असे.

बालपण :- गाडगे महाराजांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर होते. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे त्यांच्या मामाकडेच त्यांचे बालपण गेले. त्यांच्या मामाची बरीच मोठी शेतजमीन होती. लहानपणापासूनच त्यांना शेतीत रस होता, विशेषतः गुरांची निगराणी राखायला त्यांना फार आवडे.त्यांचे वडिल झिंगराजी हे परीट होते. आई सखूबाईने त्यांचे नाव डेबूजी असे ठेवले होते.

डेबूजी लहान असतांनाच त्यांचे वडिल दारूच्या व्यसनापायी मृत्युमुखी पडले. त्यामुळे डेबूजींचे. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने लहानपणापासूनच गुरे राखणे, नांगर चालविणे, शेतीवाडी करणे अशी कामे ते करत असत. त्यांना कामाची खूप आवड होती. स्वच्छता हा त्यांचा विशेष गुण होता. डेबूजींचे लग्न लहानपणीच झाले होते. त्यांना चार मुली होत्या. पण ते संसारात फारसे रमले नाहीत. घरदार सोडून अवघ्या समाजाचा संसार सुधारण्यासाठी ते घराबाहेर पडले.

१८९२ साली त्यांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारश्याच्या दिवशी त्यांनी रूढीप्रमाणे दारु व मटणाच्या जेवणाऐवजी गोडाधोडाचे जेवण दिले होते. हा त्या काळातील परंपरेला दिलेला छेद होता. गावात कोणाचे काही अडले नडले, कोठेही काही काम करावयाचे असले की, गाडगे महाराज स्वतःहून पुढे येत. सार्वजनिक हिताची कामे सर्व जनांनी' एकवटून केली पाहिजेत हा धडा त्यांनी मिटल्या तोंडी गावकऱ्यांना शिकविला.

दिनांक १ फेब्रुवारी, १९०५ रोजी त्यांनी घरादाराचा त्याग करून संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन केले, अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडलेला असल्यास



त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता आपल्या वाटेने निघून जायचे हा त्यांचा खाक्या असायचा. ते सतत एक खराटा जवळ बाळगायचे. अंगावर गोधडीवजा फाटके-तुटके कपडे आणि हातात एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असे. त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा' म्हणू लागले. ते ज्या गावात जात तो गाव झाडून स्वच्छ करीत. सार्वजनिक स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्त्वे समाजात रुजविण्यासाठी त्यांनी स्वतः सातत्याने सक्रिय राहून जिवापाड प्रयत्न केले.

समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळ्या समजुती, अनिष्ट रूढी-परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे, सोपे असत. चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, देवा-धर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, जातिभेद व अस्पृश्यता पाळू नका असे ते आपल्या कीर्तनातून सांगत. देव दगडात नसून तो माणसांत आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला. ते संत तुकाराम महाराजांना आपले गुरू मानीत. मी कोणाचा गुरू नाही, मला कोणी शिष्य नाही' असे ते कायम म्हणत. आपले विचार साध्या भोळ्या लोकांना समजण्यासाठी ते ग्रामीण भाषेचा(प्रामुख्याने वऱ्हाडी बोलीचा) उपयोग करत असत. गाडगेबाबांनी संत तुकारामांच्या नेमक्या अभंगांचा मुबलक वापरही वेळोवेळी केला. देवभोळ्या माणसापासून ते शहरी नास्तिकापर्यंत, कोणत्याही वयोगटातील लोकांना गाडगेबाबा आपल्या कीर्तनात सहजपणे गुंतवून ठेवत, आपले तत्त्वज्ञान पटवून देत. त्यांच्या कीर्तनाचे शब्दचित्र उभे करणे माझ्या ताकदीबाहेरचे काम आहे.' असे उद्गार बाबांचे चरित्रकार प्रबोधनकार ठाकरे यांनी काढले होते.

त्यांनी नाशिक, देहू, आळंदी व पंढरपूर या धार्मिक क्षेत्रांच्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या, गोरगरीब जनतेसाठी छोटी-मोठी रुग्णालये बांधली, अनेक नद्यांकाठी घाट बांधले, अतिशय गरीब, अनाथ व अपंग लोकांसाठी अन्नछत्रांची



व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांची सेवा केली.

महाराष्ट्रातील संतपरंपरेबाबत ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' असे म्हटले जाते. संत गाडगेबाबांच्या कार्यामुळे - या भागवत धर्माच्या कळसावर गाडगेबाबांनी २० व्या शतकात कर्मयोगाची ध्वजा चढवली' - असे म्हटले जाते. महाराष्ट्रातील समाजवादाचे प्रचंड व्यासपीठ', असे यथार्थ उद्गार आचार्य अत्रे यांनी संत गाडगेबाबांबद्दल काढले आहेत.लोकसेवेच्या या धकाधकीच्या प्रवासातच त्यांचे अमरावती जवळ वलगाव येथे पेढी नदीच्या पुलाजवळ २० डिंसेंबर १९५६ रोजी देहावसान झाले. गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला' या भजनाचा प्रसार करणाऱ्या, कर्मयोगावर दृढ श्रद्धा असणाऱ्या या सत्पुरुषाची आणि कर्त्या समाजसुधारकाची समाधी अमरावती येथे आहे.

अमरावती विद्यापीठाला गाडगे बाबांचे नाव देऊन संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ असे नामकरण करण्यात आलेले आहे.

गाडगे महाराजांनी कीर्तनांद्वारे लोकजागृतीचा मार्ग अवलंबला. गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला हे गाडगे महाराजांचे आवडते भजन होते.त्यांचे



जीवनावर देवकीनंदन गोपाला हा चित्रपटही निघाला आहे. यातील गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला हे गीत मन्ना डे यांनी गायले.१

१९३१ वरवंडे येथे गाडगेबाबांच्या प्रबोधनातून पशुहत्या बंद झाली., १९५४- गाडगेबाबांनी मुंबईत जे.जे. हॉस्पिटलच्या रोग्यांच्या नातेवाइकांना उतरण्यासाठी हॉस्पिटलजवळ धर्मशाळा बांधली. डॉ आंबेडकर त्यांना गुरुस्थानी मानत असत. गाडगेबाबा आणि तुकडोजी महाराज यांचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे होते.

गाडगेबाबा आणि बाबासाहेब आंबेडकर :- १४ जुलै १९४१ ला गाडगेबाबांची प्रकृती ठीक नव्हती. महानंदसामी नावाच्या त्यांच्या चाहत्याने मुंबईत आलेल्या डॉ. आंबेडकरांना गाडगे बाबांची खबर दिली. बाबासाहेब तेव्हा भारताचे कायदेमंत्री होते. आणि त्यांना संध्याकाळच्या ट्रेनने दिल्लीला रवाना व्हायचे होते. बाबांचा निरोप मिळताच त्यांनी सर्व कामे बाजूला ठेवली. २ घोंगड्या विकत घेऊन ते महानंदसामीसह रुग्णालयात गेले. कोणाकडून काही न घेणाऱ्या बाबांनी बाबासाहेबांकडून २ घोंगड्या स्वीकारल्या. पण म्हणाले डॉ. तुम्ही कशाला आले? मी एक फकीर. तुमचे एक मिनिट महत्त्वाचे आहे. तुमचा किती मोठा अधिकार आहे.

तेव्हा बाबासाहेब म्हणाले बाबा माझा अधिकार दोन दिवसाचा. उद्या खुर्ची गेल्यावर मला कोणी विचारणार नाही. तुमचा अधिकार मोठा आहे. या प्रसंगी बाबासाहेबांच्या डोळ्यात अश्रू होते. कारण असा प्रसंग पुन्हा जीवनात येणार नाही हे दोघेही जाणत होते.

गाडगेबाबांचे विचार :- एकदा गाडगेबाबा रस्त्याने जात असताना...समोर एक व्यक्ती दगडाची पूजा करत असताना त्यांना दिसली. त्याने दगडावर हार चढविला. दुधाने अंघोळ घातली. इतक्यात एक कुत्रा आला आणि मागील पाय वर करून त्या दगडावर मूत्र विसर्जन करू लागला. ती व्यक्ती चिडली. त्याला कुत्र्याचा फार राग आला. तो कुत्र्याला मारण्यासाठी हातात दगड घेऊन धावू लागला. तेव्हा गाडगेबाबा म्हणाले, बिचाऱ्या गरीब मुक्या जनावरांना त्रास का देता ? त्याला हे कुठं माहीत आहे की, माणसांचा देव दगड असतो म्हणून ?

पंढरपुरात एकदा टिळकाचे भाषण होते. तेवढ्यात बाबा समोरून येत होते. सगळ्यांच्या माना वळल्या. श्रोत्यांच्या मनातले ओळखून टिळकांनी बाबांना स्टेजवर आणले आणि दोन शब्द बोलायला सांगितले. टिळकांचे अथणीला झालेले भाषण बाबांना ठाऊक होते.. स्टेजवर येताच बाबांनी टिळकांच्या ब्राह्मण पंथाला शब्दांनी झाडायला सुरुवात केली. बाबा म्हणाले टिळक महाराज मी चुकलो. आम्ही हयातभर तुमची कापडं धुतली, इस्त्री केली. तवा आम्ही कसे मार्गदर्शन करू? महाराज काय बी करा पण आम्हालाबी ब्राह्मण करा.

# ख्रिसमसच्या तयारीसाठी सजली बाजारपेठ

जीजसचे विविध स्टॅच्यू, मोठाल्या बेल, सांताक्लॉज सॉफ्ट टॉईज, अशा बाजारात आलेल्या सगळ्या वस्तू आता ख्रिसमसच्या महिन्याची आठवण करून देत आहे. ख्रिसमसकरिता बाजारपेठ अगदी सज्ज झाली आहे. सगळ्या दुकानांत ख्रिसमसच्या वस्तूंनी बाजारपेठ सजली आहे. ख्रिसमसच्या तयारीत पिंपरी-चिंचवडमधील चर्चची देखील डागडुजी सुरू झाली आहे. सगळ्या शहरात ख्रिसमसचा माहोल तयार होऊ लागला आहे. डेकोरेशनच्या साहित्यांनी तर बाजारपेठेत अगदी झगमगाट झाला आहे.

नाताळ हा ख्रिश्चन धर्मीयांचा सण असला तरीही आताच्या काळात प्रत्येकजण नाताळ तितक्याच उत्साहाने साजरा करतो. नाताळच्या तयारीसाठी लागणा-या वस्तूंची गर्दीच जणू बाजारपेठेत दिसत आहे. नाताळच्या ख्रिसमस ट्री पासून ते अगदी ट्रीच्या सजावटीच्या वस्तूंची रेलचेल बाजारात आहे. बाजारात ख्रिसमसट्री, ख्रिसमस ट्रीच्या सजावटीच्या वस्तूंमध्ये ख्रिसमसबेल, झिरमिळ्या, ख्रिसमस ट्रीला सजवण्यासाठी लहानमोठे



गिफ्ट बॉक्स यांमध्ये अनेक व्हरायटी उपलब्ध झाली आहे. ख्रिसमसबेलमध्ये रंगीत तसेच लहानमोठे अशा निरनिराळ्या आकारात पाहायला मिळतील.याची रेंज ५० पासून ते १५० पर्यंत आहे. ख्रिसमसच्या कॅपची आणि मुखवट्यांची किंमत २० ते५० रुपयांपर्यंत आहे.

ख्रिसमससाठीचे डेकोरेशनचे साहित्य बाजारात आल्याने ग्राहकांची लगबग सुरू झाली आहे. ख्रिसमस ट्रीपासून ते झिरमिळ्यांपर्यंत सगळ्या वस्तूंनी बाजारपेठ अगदी सज्ज झाली आहे. त्यामुळे बाजारपेठेत फेरफटका मारल्यास सगळ्या डेकोरेशनच्या वस्तूंची रेलचेल पाहायला मिळते. ख्रिसमस ट्री, कॅंडल्स, डेकोरेशन टेप, ख्रिसमस बेल यांचे विविध ऑप्शन आपल्याला पाहायला मिळतील. तसेच यंदा नव्याने आलेले फायबरचे 'जीजस स्टॅचू' देखील लक्ष वेधत आहेत. त्यांचे असलेले वैविध्य हे यंदाचे आकर्षण आहे. हे स्टॅचू अगदी एखाद्याला गिफ्ट म्हणूनही देता येतील असे आहेत.

विविध प्रकारच्या बेल अगदी ५० ते ३०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. त्यात प्लॅस्टिकच्या, स्टिलच्या अशा हव्या त्या प्रकारातील बेल बाजारात मिळतील. ख्रिसमस ट्री देखील हव्या असलेल्या आकारात आणि टाईपमध्ये उपलब्ध आहेत. त्याचप्रकारे कॅंडलदेखील आपले लक्ष वेधतात. सेंटेड कॅंडल, डिझाईनर कॅंडल, वेगवेगळ्या आकार आणि रंगाच्या कॅंडल ग्राहकांना विकत घेता येतील. त्यांच्या किमती अगदी २० ते ५०० रुपयांपर्यंत आहेत. तसेच त्याचमुळे या विविध पध्दतीच्या डेकोरेशनच्या वस्तूंचे शॉपिंग सध्या बाजारात जोर धरतं आहे. त्यामुळे घराघरांतही आता सगळेजण ख्रिसमसच्या तयारीला लागले आहेत. शहरवासीयांना मिळणार यम्मी केकची ट्रीट !!!

# लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडविणार

## -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



बीड(महान्यूज): शेतकरी, शेतमजूर, ऊसतोड कामगार, दीनदुबळ्या-दलित, मागास जनतेसाठी सदैव संघर्षशील राहीलेल्या लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडविण्याचे काम राज्य शासन करील असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील पांगरी येथील वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ उभारण्यात आलेल्या 'गोपीनाथ गड' या स्मारकाचे लोकार्पण आणि गोपीनाथ मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण श्री.फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा होते. तर विधानसभा अध्यक्ष हरीभाऊ बागडे, राज्य मंत्रीमंडळातील मंत्री एकनाथ खडसे, सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, दिवाकर रावते, गिरीष महाजन, विष्णू सावरा, गिरीष बापट, प्रकाश मेहता, राम शिंदे, बबनराव लोणीकर, दिलीप कांबळे, विद्या ठाकूर तसेच भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब दानवे, भाऊसाहेब फुंडकर, सरोज पांडे, सर्वश्री खासदार रामदास आठवले, राजू शेट्टी, चंद्रकांत खैरे, सर्वश्री आमदार विनायक मेटे, महादेव जानकर, श्रीमती प्रज्ञा मुंडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या सहवासातून मिळालेल्या अनुभवामुळेच आपण राज्याचे नेतृत्व चांगल्या प्रकारे करू शकत असल्याचे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले, मुंडे साहेबांच्या अचानक जाण्यामुळे आम्हाला मोठा आघात झाला, मात्र त्यांची कन्या पंकजाताईंनी या समाजाचे नेतृत्व पुढेचालविल्यामुळे या समाजातील प्रश्नांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गडाच्या निर्मिती मध्ये राज्य शासनाचा एकही पैसा नसून तो केवळ गोपीनाथरावांच्या प्रियजणांनी आपल्या घामाच्या पैशातून उभा केला आहे. हा गड आपल्या सर्वांना दीनदुबळ्या समाजाच्या विकासासाठी सतत प्रेरणा देत राहील.

स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या कार्यापासून प्रेरणा घेवून राज्य शासन त्यांच्या स्मृती सतत तेवत ठेवणार असल्याचे सांगत मुख्यमंत्री म्हणाले, शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयी सतत जागरूक राहून संघर्ष करणाऱ्या मुंडे साहेबांच्या नावाने शेतकरी अपघात विमा योजना राज्यात राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला असून, १ कोटी ३७ लाख शेतकऱ्यांना प्रत्येकी २ लाख रूपयांचा विमा काढण्यात येत आहे. सातत्याने ऊसतोड कामगारांसाठी लढा देणाऱ्या व त्यांच्यासाठी परिश्रम घेणाऱ्या मुंडे साहेबांच्या नावाने ऊसतोड कामगार महामंडळ निर्माण केले असून, कामगारांच्या मुलांना प्रशिक्षण तसेच कामगारांना सामाजिक सुरक्षा व पेन्शन देण्याचा निर्णय घेतला असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. याशिवाय डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पुढाकाराने औरंगाबाद येथे उभारण्यात येणाऱ्या राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्थेसाठी शासन आवश्यक ती मदत करणार असल्याचेही ते म्हणाले.

समारंभाचे अध्यक्ष तथा भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांनी आपल्या भाषणात तळागाळातील जनतेसाठी गोपीनाथ मुंडे यांनी केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रातील सरकार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्यातील सरकार गोपीनाथ मुंडे यांच्या स्वप्नातील शेतकऱ्यांच्या विकासाचे ध्येय समोर ठेवून चांगले कार्य करीत असल्याचे सांगून त्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या शेतकऱ्यांच्या प्रगतीच्या विविध योजनांची माहिती सांगितली.

ग्रामविकास तथा जिल्हाच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी बोलतांना गडाची संकल्पना स्पष्ट केली. हा गड गोपीनाथ मुंडे यांच्यावर अमर्याद प्रेम करणाऱ्या जनमानसाने उभारला असून, हे गोरगरीब, कष्टकरी जनतेच्या प्रेमाचे प्रतिक आहे असे सांगत वंचितांच्या विकासाचे मुंडे साहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी हा गड नेहमी प्रयत्नशिल राहणार असल्याचे स्पष्ट केले.

स्व. मुंडे यांच्या आठवणींना उजाळा देत श्रीमती मुंडे पुढे म्हणाल्या, त्यांची आठवण सदैव आपल्या मनात राहील, त्यांच्या संकल्पना, स्वप्न आणि कार्य पूर्ण करण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न राहणार आहे. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी हा गड आहे. दीनदुबळ्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम या पुढेही सुरू राहील. या गडामध्ये अनेक सामाजिक उपक्रम साकारले जाणार असून, ऊसतोड कामगार, दीनदुबळ्या वंचित समाजाच्या विकासाची सामाजिक जडणघडण या गोपीनाथ गडाच्या माध्यमातून भविष्यात करण्याचा मानसही पंकजा मुंडे यांनी यावेळी व्यक्त केला.

प्रारंभी खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी प्रास्ताविकात गोपीनाथ गडाच्या उभारणीमागील भूमिका स्पष्ट केली. श्री. दानवे, श्री.आठवले आणि भगवानगडाचे महंत नामदेवशास्त्री यांनी आपले विचार मांडले. यावेळी गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने ऊसतोड कामगारांच्या मुलांना व अकोला येथील किडनी रॅकेटमधील पीडितांच्या कुटूंबीयांना आर्थिक मदतीचे वितरण करण्यात आले. तसेच गोपीनाथगडाच्या उभारणीमधील रचनाकार सतिश साबडे यांचा सत्कार करण्यात आला.

या समारंभास राज्यभरातून लाखोंच्या संख्येने नागरीक उपस्थित होते. शेवटी फुलचंद कराड यांनी सर्वाचे आभार मानले.

## चार्जिंगशिवाय १० दिवस चालणार स्मार्टफोन



मुंबईः जर आपण आपल्या स्मार्टफोनच्या बॅटरी बॅकअपने त्रस्त असाल तर आता अजिबात काळजी करु नका. कारण की, चीनी कंपनी Oukitel एक असा स्मार्टफोन लॉंच करीत आहे की, ज्याची बॅटरी क्षमता तब्बल १०,००० m-h इतकी आहे. कंपनीचा दावा आहे की, या स्मार्टफोनची बॅटरी एक दोन दिवस नव्हे तर तब्बल १० दिवसांपर्यंत चालू शकते. त्यामुळे आता बॅटरीच्या तक्रारीने हैराण असणाऱ्यांना हा स्मार्टफोन नक्कीच पसंतीस उतरु शकतो.

या स्मार्टफोनचे खास फीचर्स: ५.५ इंच आणि ७२० डिस्प्ले, १GHz मीडियाटेक MT६७३५ कॉड कोअर चिपसेट, २ जीबी रॅम आणि १६ जीबी इंटरनल मेमरी, ८ मेगापिक्सल एलईडी फ्लॅश रिअर कॅमेरा आणि २ मेगापिक्सल फ्रंट कॅमेरा, अँड्रॉईड ५.१ लॉलीपॉप, ४जी एलटीई, ब्ल्यूटूथ, आणि वाय-फाय, या स्मार्टफोनची किंमत जवळपास १६,००० पर्यत असू शकते.

## देहूरोड येथील गौतम बुद्धांची मूर्ती राष्ट्रीय स्मारक व्हावे

### - श्रीरंग बारणे

पिंपरी : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देहूरोड येथे बसविलेल्या गौतम बुद्धांच्या मूर्तीचे स्थळ राष्ट्रीय स्मारक व्हावे, अशी मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी संसदेत शून्य काळाच्या प्रश्नादरम्यान मांडली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९५४ साली थायलंड येथून भगवान गौतम बुद्धांची मूर्ती भारतात आणली होती, या मूर्तीची प्रतिष्ठापना देहूरोड येथे केली आहे. या मूर्ती स्थापित वास्तूला बुद्ध विहाराच्या नावाने ओळखले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते या मूर्तीची स्थापना झाली आहे. ही जागा देहूरोड कॅन्टोमेंट हद्दीत येते, त्यातच हा परिसर रेड झोनमध्ये येत असल्याने ह्या जागेवर कोणत्याही सुविधा दिल्या जात नाहीत किंवा बांधकाम करता येत नाही. या ऐतिहासिक ठिकाणी हजारोंच्या संख्येने नागरिक येतात, अशा वास्तूला राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा मिळावा व या भूमीत सर्व नागरी सुविधा देण्यात याव्यात अशी मागणी आज संसदेत श्रीरंग बारणे यांनी केली.

# पर्ल्सच्या गुंतवणूकदारांचे आझाद मैदानात आंदोलन




पीएसीएल (पर्ल्स) या चक्रानुवर्ती गुंतवणूक कंपनीत ४९ हजार कोटी रूपये अडकलेल्या गुंतवणूकदारांनी मंगळवारी आझाद मैदानात धरणे आंदोलन केले.

पीएसीएल (पर्ल्स) या चक्रानुवर्ती गुंतवणूक कंपनीत ४९ हजार कोटी रूपये अडकलेल्या गुंतवणूकदारांपैकी राज्यात एक कोटी गुंतवणूकदार असून यातील हजारो गुंतवणूकदारांनी मंगळवारी आझाद मैदानात धडक दिली.

सेबीने या वित्त व्यवहाराचे नियंत्रण करणा-या सरकारी यंत्रणेने पर्ल्स कंपनीने सर्व गुंतवणूकदारांचे पैसे ४५ दिवसांच्या आत परत करण्याचे आदेश दिल्यानंतरही आत्तापर्यत एक रूपया या गुंतवणूकदारांना मिळाला नसल्याने याविरोधात या गुंतवणूकदारांनी आझाद मैदानात धरणे आंदोलन केले.

देशभरात सहा कोटी गुंतवणूकदारांचे पीएसीएल (पर्ल्स) या चक्रानुवर्ती गुंतवणूक कंपनी या कंपनीत ४९ हजार कोटी रूपये अडकले आहेत. सर्व गुंतवणूकदारांचे ४९ हजार कोटी रूपये पर्ल्स कंपनीच्या चक्रानुवर्ती गुंतवणूक योजनांमध्ये बुडालेले आहेत.

त्यावर सेबीने पर्ल्स कंपनीने सर्व गुंतवणूकदारांचे पैसे ४५ दिवसांच्या आत परत करण्याचे आदेश १२ ऑगस्ट रोजी दिले आहेत. मात्र त्यानंतरही या कंपनीकडून आत्तापर्यंत पैसे परत करण्यात आले नसल्याने गुंतवणूकदारांकडून हे धरणे आंदोलन करण्यात आल्याची माहिती अखिल भारतीय पीएसीएल (पर्ल्स) गुंतवणूकदार संघटनेचे निमंत्रक कॉ. विश्वास उटगी यांनी दिली.